या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १० जूले २०२४ | अंक२१३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# छगन भुजबळ तुला आरक्षण फुकट मिळालं; मनोज जरांगे लातूरमध्ये नेमकं काय म्हणाले?

## मनोज जरांगे पाटील सध्या मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांना भेटी देत आहेत.



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील सध्या मराठवाड्याचा दौरा करत आहेत. मनोज जरांगे पाटील आज लातूरमध्ये आहेत. शाहू महाराजांना अभिवादन मनोज जरांगे यांनी रॅलीची सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून जरांगेंनी भाषाला सुरुवात केली. यावेळी मनोज जरांगेंनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. ज्यांना आरक्षण आहे. त्यांना याची किंमत कळायची नाही. छगन भुजबळ तुला आरक्षण फुकट मिळालं आहे. मराठ्यांचे आरक्षण फुकट खातोय. त्यामुळं तुला त्याची किंमत कळत नाही फुकट खायला गोड वाटतं, जरा संघर्ष करून बघ. ज्याला आरक्षण आहे त्याला याची किंमत नाही कळते, असं म्हणत मनोज जरांगेंनी भुजबळांवर टीका केली आहे. भुजबळांवर टीका मराठे जेव्हा बिघडल्यावर कोणाला ऐकत नाहीत. छगन भुजबळ पिसाळल्या सारखं करत आहे. फडणवीस साहेबांनी तुला मंत्रिपद लय मस्तीत येऊ नको. तुला परत कांदे खायला जेलमध्ये जावे लागेल. मराठ्यांच्या नादाला लागू नको तुला परत जेलमध्ये घालवणार आहोत. ओबीसी आणि मराठ्यात कुठेही वाद होऊ द्यायचे नाही. भुजबळला दंगल घडवून आणायची आहे. भुजबळच्या मुंडक्यावर पाय देऊन सगेसोयरे आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दात जरांगेंनी भुजबळांवर टीका केलीय.

### लातूरच्या भाषणात काय म्हणाले?

लातूरने सिद्ध केलंय, की राज्यात आम्ही कमी नाही. सरकारला माझी विनंती आहे. मराठा समाजाचा आक्रोश समजून घ्या. लेकरांना न्याय मिळवा म्हणून समाज एकवटला आहे. छगन भुजबळला कष्ट माहित नाही. फुकट कसे खावं हे माहितीय. भुजबळ तुला आरक्षण फुकट मिळाले आहे. मराठ्यांचे आरक्षण तू चोरून खातो... आमचं 16 टक्के आरक्षण छगन भुजबळने घेतलं आहे. छगन भुजबळ पिसाळल्यासारखे करतोय, असं मनोज जरांगे म्हणाले. आमच्या ओरिजनल नोंदी आहेत. राज्यातील एकही ओबीसीची नोंद सरकारी नाही. आमच्या ओरिजनल नोंदी आहेत आणि त्या रद्द करा म्हणतो. एकही नोंद रद्द झाली तर 288 उमेदवार पाडले म्हणून समजा. पक्षाच्या नेत्याच्या बाजूने बोलू नका लेकराच्या बाजूने बोला. पक्षातील एक नेता मोठा होईल पण आरक्षण साठी बोललात तर लेकरं मोठी होतील, असंही मनोज जरांगे म्हणाले.

## इंडिया आघाडीच्या नेत्यांची माजी सरपंच आजमपाशा यांच्या घरी सदिच्छा भेट.



नेकनूर/प्रतिनिधी मा.सरपंच आजम पाशा यांच्या घरी.इंडिया आघाडीचे सर्व जेष्ठ नेत्यांची भेट इंडिया आघाडी चे उमेदवार खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांना नेकनूर सर्कल मधुन आपण व आपल्या सर्व मित्रपरिवार च्या प्रयत्नातून चांगली लीड दिल्याबद्दल आज त्यांचे कौतुक केले... आजम पाशा हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीचे एकनिष्ठ नेते व बिनविरोध माजी लोकप्रिय सरपंच.लवकरच आजमपाशा यांच्या खाद्यावर पार्टीची लवकरच महत्वपूर्ण जवाबदारी देण्यात येईल असे मा.मंत्री अशोकराव पाटील यांनी सांगितले यांप्रसंगी, राजेसाहेब देशमुख जिल्हा अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, राहुल भैया सोनवणे, सुरेश तात्या पाटील,माजी. आमदार पृथ्वीराज साठे इत्यादी उपस्थित होते. या सर्वांचा सत्कार करण्यात आला. सोबत...अकरम पाशा(शाड्म सर) ,सय्यद वसिम भाई, मुन्ना भाई,मुकरम पाशा,गौस पाशा,असलम पाशा,शेख सलमान,शेख समीर,अर्शान शेख,नाविद शेख, अशफाक अली शेख, अर्शादअली शेख, जावेद पाशा, शेख शाफीख,इ. यांप्रसंगी उपस्थित होते.


## आरक्षण मुद्द्यावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली सर्वपक्षीय बैठक
## राजकीय पक्षांनी आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी
## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन

मुंबई, दि. ९: राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधीत राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होवू देणार नाही, अशी ग्वाही देऊन आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका, अभिप्राय शासनाला कळवावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. सह्याद्री अतिथीगृह येथे आरक्षणाबाबत सर्वपक्षीय बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखेपाटील, छगन भुजबळ, रवींद्र चव्हाण, शंभूराज देसाई, दादाजी भुसे, अतुल सावे, धनंजय मुंडे यांच्यासह खासदार अशोक चव्हाण, सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, गोपीचंद पडळकर, बच्चू कडू, भरत गोगावले, महादेव जानकर आदी मान्यवर उपस्थित होते. आरक्षणासंदर्भात विविध राजकीय पक्ष, संघटनांची भूमिका महत्वपूर्ण असून राज्यात मराठा, ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत चर्चेतून मार्ग निघाला पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधीत राखली जातानाच जातीय सलोखा देखील कायम राहीला पाहिजे अशी भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे मांडली. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तो कायद्याच्या चौकटीत टिकण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. हा निर्णय घेतल्यापासून शिक्षण, पद भरतीमध्ये मराठा समाजातील उमेदवारांना लाभ झाला आहे. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देतानाच अन्य समाज घटकांवर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. गॅझेटच्या तपासणीसाठी हैदराबाद येथे ११ जणांची टीम पाठविण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आरक्षण हा राजकारणाचा विषय नाही तर त्यातून सामाजिक सलोखा अबाधीत रहावा यासाठी शासनाची प्रामाणिक भुमिका आहे. त्यादिशेने शासनाची सकारात्मक प्रक्रिया सुरू असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्यात सौहार्दपूर्ण वातावरण कायम रहाव, यासाठी सर्वपक्षीय सदस्यांना विश्वासत घेऊन चर्चेतून मार्ग काढण्याबाबत आजची बैठक बोलावण्यात आली होती. मराठा आणि ओबीसी समाजातील कटुता दूर करण्यासाठी आजची बैठक होती. यापूर्वीही १ नोव्हेंबर २०२३ रोजी अशाच प्रकारे सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर मंत्री श्री. भुजबळ, श्री. मुंडे, विधानसभा उपाध्यक्ष श्री. झिरवाळ, सर्वश्री दरेकर, प्रकाश शेंडगे, अशोक चव्हाण, बच्चु कडु, सदाभाऊ खोत, प्रकाश आंबेडकर, सुरेश धस, अड. मंगेश ससाणे, कपिल पाटील, प्रशांत इंगळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

## काहीही झाले तरी परळी विधानसभा निवडणूक लढवणारच -राजेभाऊ फड यांची पत्रकार परिषदेत घोषणा

### ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी

**परळी विधानसभा मतदारसंघातील गुंडागर्दी, दहशत संपवून लोकांना भयमुक्त करण्यासाठी, कशाचीही पर्वा न करता मी परळी विधानसभा निवडून लढणार असुन मतदारसंघातील जनतेच्या लोकभावनेचा आदर करून निवडणूक लढणार आहे. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या त्याच गावच्या बाभळी असतात. असेही राजेभाऊ फड म्हणाले.**



परळी/प्रतिनिधी
राज्यातील महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या भेटी घेऊन परळी विधानसभा निवडणूक लढविण्याची मी मागणी करणार असून, काहीही झाले तरी परळी विधानसभा निवडणूक आपण लढविणारच अशी घोषणा जेष्ठ नेते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेभाऊ फड यांनी केली. सोमवारी परळी वैजनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत पुढे बोलतांना राजेभाऊ फड म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या उद्यापासून भेटी घेणार असून, परळी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी मी मागणी करणार आहे. मागील काळात विकासाच्या फक्त गप्पा मारण्यात आल्या मात्र प्रत्यक्षात विकास केला गेला नाही. या विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी राजकारणात येत आहे. बारामतीच्या धर्तीवर परळीचा आम्ही विकास करून दाखवू अशीही घोषणा त्यांनी केली. जर यात कोणी काही वेगळे करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल. परळीला आता मला भयमुक्त करायचे आहे, जनतेच्या डोळ्याला दिसेल असा विकास करून दाखवायचं आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत आपण महाविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवण्याचा आपला ठाम निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दुध उत्पादक शेतकऱ्यांनी गाय दुधासाठी प्रति लिटर रुपये 5/- अनुदानाचा लाभ घ्यावा

बीड, दि, 9 : राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी दुध खरेदी दराच्या चढ उतारामुळे निर्माण झालेल्या परिस्थीतीत दुध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने राज्यातील सहकारी दुध उत्पादक संघ खाजगी प्रकल्प यांना गाय दुध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांना प्रति लिटर रुपये 5/- अनुदान व दूध भुकटी निर्यातीस रू.30 प्रती किलो प्रोत्साहानपर अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय दि. 5.07.2024 रोजी निर्गमीत करण्यात आला आहे. त्यानुसार सदर अनुदान योजना दि. 01 जुलै 2024 ते दि.30 सप्टेंबर 2024 या कालावधीसाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागामार्फत संयुक्तरित्या राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने संबंधीत संघ व खाजगी प्रकल्प यांनी 3.5 फॅट /8.5 एस.एन.एफ. या गणप्रतिच्या दुधासाठी प्रति लिटर 30/- रुपये दर देणे आवश्यक आहे, 3.5/8.5 या गुणप्रतिपेक्षा कमी /जास्त होणाऱ्या फॅट व एस.एन.एफ. साठी प्रत्येकी 30 पैसे वाढ/वजावट करणे आवश्यक आहे.

अशा पध्दतीन प्लेस्टोरवरुन डाऊनलोड करावे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष सॉफटवेअर तयार करण्यात आले असून अनुदान पात्र गाय प्रति लिटर रुपये 5/- अनुदान दुध उत्पादक शेतक-यांच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) व्दारे जमा करण्यात येणार आहेत. (डीबीटी) करण्यासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते, आधारकार्ड व ई एआर (EAR) टॅगशी जोडलेले असणे तसेच त्याची आयएनएचीएच (IN-APH) भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे. शेतकरी आयडी संदर्भात मोबाईल मधिल प्ले स्टोअर वर 1962 नावाचे अॅप डाउनलोड करावे. सदर अॅपमधे शेतक-याचे नाव अथवा मोबाईल नंबर टाकल्यास शेतक-याचा आयडी उपलब्ध होतो.

# तूर लागवड तंत्रज्ञान आणि सेंद्रिय व्यवस्थापन शेती अभ्यासक चीचवडे यांचा सल्ला

आपल्या देशात तूर हे एक प्रमुख कडधान्य पिक आहे. भारतामध्ये एकून 47 .17 लाख हेक्टर क्षेत्रावर तुरीची लागवड केली जाते. देशात महाराष्ट्र राज्य तूर उत्पादनात अग्रेसर आहे. देशातील एकून तूर उत्पादन क्षेत्रापैकी 12 टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. कर्नाटक राज्यात तुरीचे क्षेत्र अधिक असले तरी उत्पादनात मात्र महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. खरीप हंगामातील तुर हे महत्त्वाचे पीक असून या कडधान्यामध्ये 15 ते 20 टक्के प्रथिने असतात. तूर हा मानवी आहारातील एक सकस व पोषक घटक आहे. या लेखात आपण तूर पिकाच्या सुधारित लागवड तंत्रज्ञान आणि सेंद्रिय निविष्ठांचा वापर करण्याचा सल्ला शेती अभ्यासक पल्लवी चिंचवडे यांनी दिला आहे तूर पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी आणि पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन आवश्यक असते. आम्लयुक्त आणि क्षारयुक्त जमिनीत तुरीचे पिक चांगले येत नाही कारण अशा जमिनीत तूर पिकाच्या मुळांवर रायाझोबिअम जीवाणूंच्या गाठींची वाढ होत नसल्याने हि रोपे पिवळी पडतात. तसेच चोपन आणि पाणथळ जमीनही तूरीला मानवत नाही. तूर लागवडीअगोदर चांगले कुजलेले शेणखत किंवा हिरवळीच्या खतांचा वापर मातीची पोषकता आणि अन्नद्रव्ये व्यवस्थापनासाठी करणे महत्वाचे आहे. तूर लागवडीच्या वेळेस दमट आणि अधिक आर्द्रता असलेले वातावरण असेल तर उगवण चांगली होते. साधारणपणे 700-800 मिलीमीटर पाऊस तुरीसाठी आवश्यक आहे. लागवडी नंतर एक दीड महिना चांगला पाऊस गरजेचा असतो तर फुले आणि शेंगा लागणीच्या वेळी प्रखर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. आपली जमीनचा प्रकार कोणता आहे, पर्जन्यमान किती आहे, पाण्याची उपलब्धता आहे का तसेच आपल्या भागात कोणकोणत्या रोग-किडींचा अधिक प्रादुर्भाव होतो या सर्व गोष्टींचा विचार करून वाण निवडावा. महाराष्ट्रात बीडीएन 2013 - 41 (गोदावरी), बीडीएन-711, बीडीएन- 716 हे चांगल उत्पादन देणारे वाण आहेत. लागवडीपूर्वी जमीनची मशागत करून जमीन भुसभुशीत करावी. पेरणी करताना टोकन पद्धतीचा वापर केल्यास दोन रोपांमध्ये योग्य अंतर राहते. आंतरपीक पद्धतीने पेरणीसाठी एकरी 5-6 किलो बियाणे तर सलग तूर पेरणार असेल तर

7.5-8 किलो बियाणे एकरी पुरते. हवेतील नत्र स्थिर करण्यासाठी व मातीतील स्फुरद पिकाला उपलब्ध होण्यासाठी ब्रॅडीरायझोबियम व पीएसबी जीवाणुसंवर्धकाची 5 ते 10 मिली प्रति 1 किलो बियाणे याप्रमाणात बीजप्रक्रिया करावी. घातक बुरशीपासुन बियाणे रक्षणासाठी ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स 5 ग्राम प्रति 1 किलो बियाणे याप्रमाणे बिजप्रक्रीया करावी. गुळाचे द्रावण बियाण्यावर गुळाचे द्रावण शिंपडून नंतर ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स वापरावे. जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून ते उशिरा पेरणी जुलैच्या शेवटच्या आठवड्या पर्यंत करता येते. जमिनीमध्ये पुरेशी ओल आणि पावसाचा अंदाज घेऊन पेरणी करावी. उगवण झाल्यानंतर 5 % निंबोळी अर्क अथवा अझाडीरेक्टीन 10000 पीपीएम 1 मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यासोबतच सोयाबीनमध्ये अंतर पिक तूर असेल तर रसशोषक किडींच्या व खोडमाशी व्यवस्थापनासाठी पिवळे-निळे चिकट सापळे 30 प्रती एकरी लावावेत. पाने खाणार्या अळीच्या निरीक्षणसाठी प्रत्येकी 15 स्पोडो व हेली ल्युर कामगंध सापळे प्रती एकरी पिकाच्या उंचीपेक्षा 1 फुट उंच काठीवर लावावेत. कामगंध सापळ्यांचे निरीक्षण करून अडकलेले पतंग नष्ट करावेत तसेच ल्युर दर 20-25 दिवसांनी किंवा गरज असेल तेव्हा बदलावेत. अन्नद्रव्ये व्यवस्थापन चांगल्याप्रकारे



होण्यासाठी प्रती एकरी ह्युमिक असिड द्रावण 10 लि + ट्रायकोडर्मा 10 लि. + जीवामृत 100 लि.+ वेस्ट डिकोम्पोजर 10 ली फवार्याच्या सहाय्याने आळवणी करावी. किंवा प्रत्येक वेळी पाणी देताना पाण्यासोबत सोडावे. कीड व्यवस्थापणासाठी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क किंवा ग्रीन प्लानेट कंपनीचे पेस्टो हिट प्लस आलटून पालटून फवारावे. कीड रोग नियंत्रणाच्या सर्व फवारण्या प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन करायच्या आहेत. शाखीय वाढ जास्त झाली असेल तर शेंड्या कडील 5 इंच भाग खुडून टाकावा. शेंड्याकडील भाग खुडून टाकल्यामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. याकरिता 10 मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात बायोमिक्सची फवारणी करावी. फुले लागण्याच्या वेळी फुल्विक असिडची फवारणी केल्याने फुल गळ थांबते तसेच उत्तम फुलधारणा होण्यास मदत होते. पिक दीड महिन्याचे होई पर्यंत कोळपण्या आणि खुरपणी करून पिक तणविरहित ठेवावे. तन नियंत्रणासाठी हात कोळपे हाही एक उत्तम पर्याय आहे. तुरीचे पिक शक्यतो पावसावरच येते. पावसाचा खंड पडलाच तर अशा वेळी पाणी देण्याचे नियोजन करावे. फुले लागण्याच्या वेळी, फुलकळी लागताना, पिक फुलोऱ्यात असताना आणि शेंगांमध्ये दाने भरताना पाण्याचा तान पडू देऊ नये. अधिक पाऊस झाल्यास पाणी शेतामध्ये साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. मागच्या काही वर्षांत तुरीमध्ये वांझ रोग आढळून येत आहे. लवकर पेरणीमुळे फुलोरा येताना वाढलेला ओलावा, सतत पडणारा पाऊस, अधिक आर्द्रता, इरीयोफाईड कोळी आणि विषाणू प्रसारक हवामान, वातावरण बदल, बियाण्यामध्ये दोष अशी अनेक कारण वांझ रोगास कारणीभूत आहेत. त्यामुळे रोग प्रतिकारक वाण निवडणे, खतांचा संतुलित वापर आणि एकात्मिक कीड-रोग नियंत्रणातून तुरीचे अपेक्षित उत्पादन घेणे शक्य आहे. यासोबतच तुरीमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव वाढीच्या सुरुवातीला आणि वाढीच्या नंतरच्या अवस्थेत देखील आढळून येतो. सुरुवातीला होणारी मर हा सततचा पाऊस, जमिनीवर पाणी साचणे या कारणांमुळे होतो. त्यामुळे चिबड जमिनींमध्ये तुरीची लागवड करताना शक्यतो रुंद सरी वरंबा पद्धतीने करावी. शेतामध्ये पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. नंतर वाढीच्या अवस्थेत होणाऱ्या मरीसाठी सुरुवातीपासूनच शेणाच्या स्लरी मधून ट्रायकोडर्माची ड्रेंचींग (आळवणी) करत राहणे अत्यंत गरजेचे आहे. मर रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बीजप्रक्रिया खूप महत्वाचा रोल बजावत असते. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने जैविक बीजप्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे.

## हातात भगवे झेंडे, गाड्यांचा मोठा ताफा, वसंत मोरे मुंबईच्या दिशेने रवाना, आज ठाकरेंची मशाल हाती घेणार मी शिवसेनेत प्रवेश करत नाही तर मी पुन्हा शिवसेनेतच येतोय




पुणे /पंकज भंडारी पुणे : लोकसभेची निवडणूक वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या तिकीटावर लढवली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचे डिपॉझिट जप्त झाले होते. यानंतर वसंत मोरे यांनी ठाकरे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. गाड्यांचा मोठा ताफा, हातात भगवे झेंडे घेत पुण्याचे वसंत मोरे मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. ते आज उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. मातोश्री येथे आज उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत वसंत मोरेंचा ठाकरे गटात प्रवेश होणार आहे. वसंत मोरे हे पुण्यातून जंगी शक्तीप्रदर्शन करत मुंबईकडे मार्गस्थ झाले आहेत.

# वनविभाग फुकेवाडी करांच्या मुळावर ; रस्ता डांबरीकरणाला वनविभागाचा अडसर ; ८ पैकी ६ किलोमीटर डांबरीकरण पुर्ण वनविभागाने २ किलोमीटर रस्ता अडवला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रामपंचायत अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत असलेल्या फुकेवाडी येथील ग्रामस्थांना डोंगराळ भागातुन रस्त्याची अडचण असल्याने ग्रामस्थांनी वारंवार जिल्हा दरबारी हेलपाटे घालुन लोकप्रतिनिधींच्या पाया पडून डांबरीकरण रस्त्याला परवानगी मिळवली.मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तब्बल पावणे दोन कोटी रुपये खर्चून रस्ता तयार झालेला असतानाच असतानाच वनविभागातील आधिका-यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे रस्ता प्रलंबित राहीला असुन वनविभागाने रस्ता अडवल्याने कंत्राटदार अर्धवट काम करून सोडुन दिला आहे.यामध्ये फुकेवाडी करांचे हाल होत असुन नदीवरील पुल तसेच दोन्ही बाजुंनी डांबरीकरण झालेले असताना वनविभागाच्या हद्दीतील रस्ता काम रखडलेलेच आहे. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फुकेवाडी ग्रामस्थांसोबत शासन दरबारी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सविस्तर माहितीस्तव बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत फुकेवाडी हे बालाघाटाच्या डोंगर द-यात वसलेले गाव ३५ -४० घरं असणा-या बहुतांश ग्रामस्थ ऊसतोड मजूर, डोंगरदऱ्यातील सिताफळ,लिंबु आदि रानमेवा विकुन पोट भरणारी.यांना बाजारहाट , दवाखाना,शाळा आदिंसाठी अडीच किलोमीटर डोंगर चढून ८ किलोमीटर अंतरावर लिंबागणेश याठिकाणी जावं लागतं.देशाला स्वातंत्र्य मिळुन



७५ वर्षे होऊन सुद्धा शासनाची बस न पाहिलेलं बीड शहरापासून २० किलोमीटर अंतरावर असलेले गाव.१९७४ पासुन याठिकाणी ४ थी पर्यंत जिल्हा परीषद शाळा आहे. वनविभागाने रस्ता रोखल्याने ग्रामस्थ हवालदिल

बापजाद्यापासुन याठिकाणी वास्तव्य करणाऱ्या ग्रामस्थांना २००९ साली शासकीय निधीतून कच्चा रस्ता करण्यात आला होता.मात्र मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इजिमा ११५ ते फुकेवाडी रस्ता सुधारणासाठी या अडीच किलोमीटर डोंगराळ भागातील रस्त्यांसाठी १ कोटी ६८लाख रुपये निधी मंजूर होऊन डी.बी. कनस्ट्रक्शन मार्फत रस्ता करण्यात आलेला आहे.

मात्र वनविभागाच्या जागेतुन हा रस्ता जात असल्याने वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्ता अडवला आहे त्यामुळे कंत्राटदार यांनी रस्त्याचे काम अर्धवट करून सोडुन दिले आहे. त्यामुळे रस्ता पुर्ण होणार की नाही यामुळे ग्रामस्थ चिंताग्रस्त आहेत.

वनविभागाकडून सहकार्य अपेक्षित,ग्रामस्थांची अडचण समजून घेणे गरजेचे :- डॉ.गणेश ढवळे

फुकेवाडी गाव ७५ वर्षांपासून त्याठिकाणी वसलेले असुन ग्रामस्थांना याच रस्त्याने दवाखाना ,शाळा, बाजारहाट यासाठी लिंबागणेश याठिकाणी जावे लागते. गेल्या १५ वर्षात वनविभागाच्या ताब्यात डोंगराळ भाग आलेला आहे.तसेच यापूर्वीही शासनाच्या निधीतून याठिकाणी कच्चा रस्ता झालेला आहे. त्यामुळे शासनाचे पावणे दोन कोटी रुपये खर्चून होणा-या रस्तेकाम अडवण्याची वनविभागाची भुमिका आडमुठेपणाची अन्यायकारक असुन वनविभागातील अधिकारी यांनी ग्रामस्थांची २ किलोमीटर डोंगर चढून जाण्याची अडचण लक्षात घेऊन सहकार्य करणं अपेक्षित आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# नऊ दिवसांपासून सुरू असलेले केकत सारणी येथील धनगर समाजातील चार युवकांचे उपोषण खा. बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्तीने स्थगित !

## खा. बजरंग सोनवणे यांचे धनगर समाजाचा एस टी प्रवर्गात समावेश करण्यासाठी संसदेत मांडण्याचे आश्वासन !

**केज/प्रतिनिधी**

मागील नऊ दिवसा असून धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्यात यावा. या मागणीसाठी बीड जिल्ह्यातील केकतसारणी तालुका केज येथे चार युवकांनी पाण्याच्या टाकीवर चढून आमरण उपोषण सुरू केले होते. तर एका तरुणाने आत्महत्येचा देखील प्रयत्न केला होता. त्या उपोषणाला खा. बजरंग सोनवणे यांनी भेट देवून त्यांच्या मागणी संदर्भात संसदेत आवाज उठविण्याची आश्वासन दिल्या नंतर अखेर नवव्या दिवशी त्यांचे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील




केकतसारणी येथे धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करून त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे. या मागणीसाठी अनंत धायगुडे, संदीपान धायगुडे, अंकुश मनाडे, महादेव नरवटे या तरुणांनी १ जुलै पासून गावातील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने उपोषण सुरू होते. त्यांच्या उपोषणाला नऊ दिवस झाले असल्याने उपोषणार्थी यांची प्रकृती खालावली होती. मात्र जो पर्यंत सरकार धनगर समाजातील नेत्यांशी चर्चा करून एस टी प्रवर्गात समावेश होत नाही तो पर्यंत उपोषण सुरू राहणार आहे असा त्यांनी पवित्रा घेतला होता. तर या मागणीसाठी अजय शिंदे या तरुणाने उपोषण सुरू असलेल्या पाण्याच्यां टाकीवरून उडी मारण्याचा देखील प्रयत्न केला होता. त्या नंतर अजय शिंदे याने पुन्हा घरातील आडूला गळफास घेतला होता. परंतु सुदैवाने तो सध्या वाचला आहे. दरम्यान आज दि. ९ जुलै रोजी खा बजरंग सोनवणे यांनी केकेत सारणी येथे जावून उपोषणर्थी यांची भेट घेवून त्यांच्याशी संवाद साधला आणि धनगर समाजाला एस टी प्रवर्गात समावेश करण्यासाठी माहविकास आघाडीचा संसद सदस्य म्हणून संसदेत प्रश्न उपस्थित करून कायम आंदोलनकर्त्या सोबत असल्याचे आश्वासन दिले. खा. बजरंग सोनवणे यांच्यावर धनगर समाजातील उपोषणार्थी यांनी विश्वास व्यक्त करून उपोषण स्थगित केले आहे.

# शिक्षकांच्या मागणीसाठी विद्यार्थी आक्रमक विद्यार्थ्यांची सि.ओ च्या चेंबरला धडक



**नेकनुर/प्रतिनिधी**

नेकनुर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत गेल्या दोन तीन वर्षांपासून मराठी व उर्दू माध्यमासाठी गणीत, इंग्रजी, विज्ञान, मराठी या विषयासाठी शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे . वारंवार मागणी करूनही शिक्षक मिळत नसल्याने विद्यार्थी व पालकांनी आक्रमक भूमिका घेतली असून थेट जिल्हा परिषद बीड येथे जाऊन प्रचंड घोषणाबाजी करत प्रभारी मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती संगीता देवी पाटील यांच्या चेंबर मध्ये धडक दिल्याने जिल्हा प्रशासन खळबळुन जागे झाले आहे.१२ जुलै पर्यंत शिक्षक देण्याचे मान्य केल्याने विद्यार्थी पालकांने दालन सोडले आहे.हे आंदोलन ग्रा.पं सदस्य सय्यद साजेद अली ऊर्फ बाबु भाई, सय्यद खालेद पत्रकार, संजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील नेकनुर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा नावाजलेली होती येथुन शिक्षण घेऊन अनेक जण उच्चपदावर गेले आहे.आगदी जिल्हाधिकारी, न्यायमूर्ती, तहसीलदार, इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षक सह विविध पदांवर गेले आहे.परंतु गेल्या अनेक वर्षांपासून या शाळेची बिकट अवस्था झाली आहे.शाळेची ईमारत जिर्ण झाली असून शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.या सर्व बाबींने त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत सदस्य सय्यद साजेद अली ऊर्फ बाबु भाई, सय्यद खालेद पत्रकार, संजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली घोषणाबाजी करत जिल्हा परिषदेत जाऊन मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती संगीता देवी पाटील यांच्या थेट दालनात जाऊन आपल्या व्याथा मांडल्या व मुख्यकार्यकारी अधिकारीनी सर्व ऐकून शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याशी चर्चा करून १२ जुलै पर्यंत शिक्षक देण्याचे मान्य केले आहे.या वेळी पालक पत्रकार अमजद पठाण,मुदस्सीर कादरी, सय्यद फेरोज पप्पू,उमर खान, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# परळी शहरातील भीम नगर येथील विविध नागरी समस्या साठी १५ ऑगस्ट रोजी उपोषणास बसणार-बालासाहेब जगतकर

## निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

**परळी/प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर येथील विविध नागरी समस्या साठी 15 ऑगस्ट रोजी परळी नगरपालिकेसमोर उपोषणास बसणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख तथा तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या पाच वर्षाखाली मोठा गाजावाजा करून बौद्धांची मते घेण्यासाठी बौद्धांचे श्रद्धास्थान असलेले बौद्ध धम्मकेंद्राची उभारणी करण्यात येईल अशी घोषणा करून आज पाच वर्षे झाले यात अनेक वेळा लेखी निवेदन देऊन प्रत्यक्ष भेटून व येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात सदरील धम्मकेंद्राचा निधी मंजूर करून घेण्यात यावा असे सांगूनही पावसाळी अधिवेशनात या धम्मकेंद्रासाठी छद्दाम ही मंजूर करण्यात आलेला नाही. तसेच भीम नगर येथील स्मशानभूमी राहिलेले अर्धवट कामे व लाईट व्यवस्था करण्यात यावी झाडे झुडपे तोडण्यात येऊन साफसफाई




करण्यात यावी असे अनेक वेळा निवेदने व प्रत्यक्ष भेटूनही आतापर्यंत कुठल्याच प्रकारचे कामे झालेले नाहीत तसेच महिलांचे सार्वजनिक संडास ही थातूरमातूर दुरुस्त करून त्यामध्ये ना पाणी, ना लाईट अशा प्रकारे नगरपालिकेने काम केले आहेत तसेच परळी नगरपालिकेत कोट्यावधी रुपयाचा निधी पाणीपुरवठ्यासाठी आला असता गेल्या सहा महिन्यापासून परळी नगरपालिकेला निवेदन देऊनही साधा एक खड्डा ही बुजवण्यात आला नसून एक वाल ही बसवला नाही व शंकर साळवे यांचे घर ते सखाराम जगतकर यांच्या घरापर्यंत पाईपलाईन टाकून वाल टाकण्यात येऊन प्रबुद्ध नगर वासीयांचा पाण्याचा प्रश्न सोडवावा या भागातील नागरिकांना अधिकृत नळ कनेक्शन घेऊनही पाण्याचा थेंबही मिळत नाही असे लेखी निवेदन देऊन ही व प्रत्यक्ष भेटूनही कुठल्याच प्रकारची कामे न झाल्याच्या निषेधार्थ येत्या 14 ऑगस्ट 2024 पर्यंत सर्व कामे करण्यात यावेत अन्यथा 15 ऑगस्ट 2024 रोजी म्हणजेच स्वतंत्र्य दिनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परळी शहरातील नगरपालिके समोर अमरण उपोषणास बसणार असल्याची माहितीही देण्यात आली असून तसे देखील निवेदन ही माननीय जिल्हाधिकारी साहेब जिल्हा कार्यालय बीड यांना लेखी निवेदन दिले असून यावेळी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख पश्चिम प्रा.बालाजी जगतकर ऍड.डी. आर. गोरे वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम वीर, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पूर्व बालासाहेब जगतकर वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी तालुकाध्यक्ष राजेश सरवदे वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी तालुका महासचिव ज्ञानेश्वर गीते वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी तालुका उपाध्यक्ष संतोष व्हावळे उपस्थित होते अशी माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# महावितरणची स्मार्ट प्रीपेड मीटरची योजना लागू करणे म्हणजे वीज ग्राहकांना विजेचा शॉक देणे आहे-युवा नेते भीमसेन आप्पा लोमटे

## १ एप्रिल २०२५ पासुन ही योजना राबविली जाईल. ही योजना वीज ग्राहकांना विजेचा शॉक देण्यासारखी आहे

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

:महावितरण कंपनीने स्मार्ट प्रीपेड मीटरचे योजना महाराष्ट्रात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. टप्या टप्प्यात हे मीटर घरात शेतात बसणार आहेत. आयोगाच्या आदेशानुसार वीजदरवाढींच्या रूपाने १ एप्रिल २०२५ पासुन ही योजना राबविली जाईल. ही योजना वीज ग्राहकांना विजेचा शॉक देण्यासारखी आहे. ही लागू करू नये भीमसेन आप्पा लोमटे यांनी केली आहे. पूर्वीप्रमाणेच पोस्टपेड मीटर मार्फतच ही योजना सुरू ठेवावी अशी मागणी भीमसेन आप्पा लोमटे यांनी केली आहे. वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणता मीटर वापरायच याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क सबंधित वीजग्राहकांना आहेत. परंतु कंपनी अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या हक्काचे उल्लघंन करीत आहे. ग्राहक म्हणून आमच्या कायदेशीर हक्काचे रक्षण करणे हा आमचा अधिकार आहे. महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर नुसार मीटर्सचा खर्च १२,०००/- रुपये प्रति मीटर आहे. प्रीपेड मीटरसाठी केंद्र सरकारने ९०० रुपये अनुदान दिले आहे. म्हणजे ११,१००/- रुपये इतका बोजा ग्राहकांवर कर्ज टाकून काढला जाणार आहे. या कर्जाला आमचा विरोध आहे. तसेच या कर्जामुळे व्याज, घसारा व खर्च वसूल करण्यासाठी वीज दरात वाढ होणार ग्राहकांना हा बोजा मान्य नाही असे भीमसेन आप्पा लोमटे यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# केतुरा गावचे विधमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांच्या प्रयत्नातून बीड ते श्री क्षेत्र नारायण गड बस सेवा सुरु,

## विद्यार्थी विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

**बीड/प्रतिनिधी**

श्री क्षेत्र नारायण गड येथील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यासाठी लाल परी ची आज पासून सुरुवात बीड ,खापरपांगरी ,उंबरद ,तांदळवाडी ,केतुरा, रुद्रापुर फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायण गड अशी विद्यार्थ्यांसाठी नवीन बस सेवा चालू करण्यात आली, बीड तालुक्यातील केतुरा या गावचे लोकप्रिय सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी अनेकदा पाठपुरावा करून, एसटी बस सेवा सुरू करण्याबाबत, अनेक वेळा विभागीय कार्यालयामध्ये निवेदन दिले आहेत, आज विभागीय कार्यालयातील कर्मचारी यांनी बीड केतुरा साक्षाळपिंपरी मार्गे श्री क्षेत्र नगद नारायण गड ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे, यावेळी एसटी कर्मचारी वाहक कंडक्टर यांचा सत्कार, केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी केला आहे,बीड बस डेपोचे गवते सर, होके सर , होले सर ,नागरगोजे सर, आणि बनसोडे सर यांचे विशेष सहकार्य झाले यावेळी शाळेतील महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, नगद नारायण विद्यालयाची शिक्षक वृंद पवळ सर ,लोंढे सर, भोसले सर, वखरे सर, शेळके सर, गायकवाड सर, गोरख घोंगडे शिपाई व मौजे केतुरा येथील ग्रामस्थ दिलीप रहाडे ,राजेंद्र घार्गे, महादेव तळेकर, गजेंद्र बेद्रे, गणेश भुसारी ,भीवसेन निळकंठ ,नंदकुमार घार्गे, दादासाहेब निळकंठ, बंडू तळेकर, अशोक शिंदे, श्रीराम शिंदे, गोविंद तळेकर, मिठू नागरगोजे, व इतर ग्रामस्थ यांनी बस सेवा आगाराची आभार मानले.

# अंबाजोगाई स्वाराती रुग्णालयाला मिळणार नवीन सीटी स्कॅन मशीन आ. नमिता मुंदडांचे प्रयत्न यशस्वी; १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई - येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात नवीन सीटी स्कॅन मशीन करण्यासाठी राज्य शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मागील आठ महिन्यापासून रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेत केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी आग्रही पाठपुरावा केल्यानंतर शासनाने मंगळवारी (दि.०९) निधी मंजुरीचे आदेश काढले अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात अत्यल्प दरात अद्यावत यंत्रसामुग्रीद्वारे तपासणी करून उपचार होत असल्याने येथे रुग्णांची दररोज प्रचंड गर्दी असते. परंतु येथील सिटी स्कॅन मशीन मागील



आठ महिन्यापासून बंद पडली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक अडचणींवर मात करत मागील महिन्यात हि मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु करण्यात यश मिळाले होते. त्यामुळे अति अत्यावस्थ रुग्णांची गैरसोय काही प्रमाणात कमी झाली होती. मात्र कालबाह्य झालेली सध्याची मशीन कितपत चालेल याबाबत शंका असल्याने आ. नमिता मुंदडा यांनी नवीन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांकडे नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी युद्धपातळीवर पाठपुरावा सुरु केला होता. अखेर आ. मुंदडा यांचे प्रयत्न फलदायी ठरले असून राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने राज्य योजनेंतर्गत मंजूर अनुदानातून स्वाराती रुग्णालयात १२८ स्लाइस सीटी स्कॅन मशीन खरेदीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. लवकरच निविदा प्रक्रिया पार पाडून नवीन मशीन येणार असल्याने रुग्णांना त्याचा प्रचंड लाभ होणार आहे. यानिमित्ताने सिटी स्कॅन मशीनसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, लोकनेत्या पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार १० जूले २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# मनोज जरांगे यांचा फडणवीस यांच्यावर मोठा आरोप, फडणवीस हेच भुजबळांना ?

## फडणवीसांवर मोठा आरोप

**यावेळी जरांगे पाटील यांनी नांदेड येथे माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केला. मी त्यांना समजून सांगितले आहे. त्याचा अर्थ त्यांनी काय काढायचा तो काढावा. ते जनतेशी खुनशी पणाने वागतात हे त्यांच्या लक्षात आणून दिले आहे. त्यांच्यामुळे गरिबांचे वाटोळे होत, हे त्यांच्या लक्षात आणून दिले आहे. त्यांना वाटतं नेते जवळ आले म्हणजे जनता जवळ आली. आता त्यांनी भुजबळ यांना जवळ केलं आहे. .फडणवीस भुजबळ यांना बळ देतात हे आता जनतेच्या लक्षत आलं आहे. फडणवीस यांनी भुजबळ यांना मंत्रीपद यासाठीच दिलं आहे का? असा सवाल त्यांनी केला.**

**बीड प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलन उभं केले आहे. पुढील वादळापूर्वीची ही शांतता रॅली असल्याची चर्चा आहे. 6 ते 13 जुलैपर्यंत त्यांचा मराठवाडा दौरा आहे. या दरम्यान ते मराठवाड्यात समाज बांधवांशी संवाद साधत आहेत. शांतता रॅलीतून त्यांनी समाजाला एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्यावर पुन्हा हल्ला चढवला आहे. त्यांनी फडणवीस यांच्यावर मोठा आरोप केला आहे. मराठ्यांची काही माकडं फडणवीसांसोबत मंत्री म्हणतात हे आरक्षण टिकणार नाही म्हणजे आरक्षण हेच देणार आणि उडवणार हेच म्हणजे सगेसोयरे अंमलबजावणी हे देणार आणि आणखी उडवणार हे नक्की आहे, या दुटप्पी धोरणावर त्यांनी टीका केली. सरसकटच्या अध्यादेशाने यांचं फार पोट दुखतं, सगे सोयरे अंमलबजावणी यांनीच द्यायची आणि टिकवायची जबाबदारी सुद्धा यांचीच राहील आमहाला गॅझेट सुद्धा लागू पाहिजे. मराठ्यांचे 2-4 माकड फडणवीस यांच्या बाजूने बोलतात. त्यामुळे समाजात नाराजी आहे. डेड लाईनबद्दल काहीही चर्चा झाली नाही ते देतील आणि टिकवतील. शंभुराजे



देसाई काय म्हणाले

शंभूराजे देसाई यांना काल आणि रात्री बोललो आहे. गॅझेट अंमलबजावणी होणार असं त्यांनी सांगितलं. सगे सोयरे अंमलबजावणी आमच्या पद्धतीने आम्हाला हवी असं त्यांना आम्ही सांगितलं. सौम्य पद्धतीने मी सरकारवर टीका करावी अशी कोणतीही चर्चा झाली नाही. मराठा समाजातील शेवटचा माणूस सगे सोयरेमध्ये जाईपर्यंत मी शांत बसणार नाही. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी तातडीने मागण्यांवर अंमलबजावणी करावी. दौऱ्याचा आज चौथा दिवस आहे. आता तिसऱ्या जिल्ह्यात दौरा झाला आहे. राज्यातील मराठा आता मुलांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरलाय. आम्ही आमच्या मुलांच्या न्यायासाठी का रस्त्यावर येऊ नये? असा सवाल त्यांनी केला.

# विरोधकांनी आपली राजकीय जात दाखवली, देवेंद्र फडणवीस प्रचंड संतापले, नेमकं कारण काय?

राज्य सरकारने आज मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मार्ग काढण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावली. पण या बैठकीवर महाविकास आघाडीकडून बहिष्कार टाकण्यात आला. त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चांगलेच संतापले. सर्वपक्षीय बैठकीनंतर देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर घणाघात केला. “मराठा आरक्षणासारख्या अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. अगदी ठरवून ऐनवेळी संध्याकाळी सहा वाजता विरोधी पक्षाने म्हणजेच महाविकास आघाडीने या बैठकीवर बहिष्कार टाकला. मराठा समाजाच्या प्रश्नांवर बोलायला त्यांना वेळ नाही. मात्र विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या घरी बसून ते निवडणुकीची बैठक करतात. त्यासाठी त्यांना वेळ आहे. त्यामुळे एकप्रकारे आपली राजकीय जात कुठली हेच दाखवण्याचा ते प्रयत्न करत आहेत”, असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी केला “ही अतिशय गंभीर बाब आहे की, ज्यावेळी महाराष्ट्रात समाजासमाजात तेढ निर्माण झालेली आहे, ज्यावेळी वेगवेगळे समाज एकमेकांसमोर उभे आहेत, त्यावेळी सर्वपक्षाच्या नेत्यांनी एकत्रित येऊन मार्ग शोधले पाहिजेत, अशा प्रकारची



परंपरा असताना केवळ राजकीय फायद्याकरता दोन्ही समाजात खोटं बोलायचं आणि आपली राजकीय पोळी भाजायची, अशा प्रकारच्या मानसिकतेतून विरोधी पक्षाने आज या ठिकाणी बहिष्कार घातला. याचा अर्थ त्यांच्याकरता कुठलाच समाज महत्त्वाचा नाही. त्यांच्यासाठी सत्ता आणि निवडणुकाच महत्त्वाच्या आहेत”, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केला. सर्वपक्षीय बैठकीत काय घडलं? फडणवीस म्हणाले...

“तथापि, या ठिकाणी विविध पक्षांचे नेते आले होते. त्यांनी आपापले मुद्दे योग्यप्रकारे मांडले आहेत. एक लार्जर कन्सेन्स तयार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी ही सूचना मांडली आहे की, सर्व सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना सरकारने या मुद्द्यावर त्यांचं म्हणणं काय आहे हे लेखी मांगावं आणि प्रत्येकाने आपली भूमिका स्पष्ट करावी. दुटप्पी भूमिका ठेवू नये, अशा प्रकारचा प्रस्ताव मांडला आहे.

# श्री स्वामी समर्थ मठ ओंदे येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**विक्रमगड/प्रतिनिधी**

विक्रमगड तालुक्यातील ओंदे येथील श्री स्वामी समर्थ मठ येथे तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास पालघर लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार डॉ.हेमंत सवरा, जि प अध्यक्ष प्रकाश निकम, आमदार श्रीनिवास वनगा, लक्ष्मीकांत दांडेकर गुरुजी, पोलीस उपनिरीक्षक जगताप साहेब, पत्रकार समीर आळशी तसेच



आदी मान्यवर उपस्थित होते. दिप प्रज्वलन व प्रतिमेच्या पुजनानंतर आपल्या भाषणात खासदार सवरांनी दांडेकर गुरुजींनी राबविलेल्या उपक्रमाचे खुप कौतुक केले. तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी दांडेकर गुरुजींच्या या कार्याची दखल घेत त्यांना शासनामार्फत पुरस्कार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले

## जरांगेंचा धनंजय मुंडे यांच्यावर जातीवादाचा आरोप तर गिरीश महाजन यांना ‘जामनेर’ची धमकी

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री गिरीश महाजन, मंत्री धनंजय मुंडे आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. मनोज जरांगे यांनी गिरीश महाजन यांना जामनेर मतदारसंघावरुन धमकी दिली आहे. तर ‘जातीवादी पालकमंत्री’ म्हणत मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावरही हल्लाबोल केला आहे. तसेच मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावरही टोकाची टीका केली आहे. दरम्यान, “आपल्या काही चुका या निवडणुकीत झाल्यात त्या पुन्हा होऊ देऊ नका. तुम्ही लोकसभेला एकगठ्ठा मतदान केले. पण काही मराठ्यांनी ज्यांना मतदान करायचे नव्हते त्याला मतदान केले. कारण मी संगितले होते की, कोणाला द्यायचे हे सांगितले नव्हते. म्हणून 10 हजार मतं दुसऱ्याला पडले आणि 20 हजार मतदारांनी मतदानच केले नाही”, असा दावा मनोज जरांगे यांनी केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com